# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## <u>मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृह</u>

### मा. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. २८/०२/२०२० रोजी दुपारी ११.३० वाजता आयोजित स्थायी समिती विशेष बैठकीचे इतिवृत्त.

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचेकडील पत्र क्र.साशा/कार्या-३/नपा-२/पिठासीन अधि./स्था.स. सभापती निवड/३९/२०२०, दि. १४/०२/२०२० अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी श्री. मिलिंद बोरीकर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे . त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेली आजची विशेष बैठक सकाळी ११.३० वाजता श्री. मिलिंद बोरीकर, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली . सदर सभेस खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते . उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्री . वासुदेव शिरवळकर यांनी केली.

<u>उपस्थित सदस्य :-</u>

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल |
| ३ | श्री. श्रीप्रकाश सिंह (मुन्ना सिंग) |
| ४ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह |
| ५ | श्रीम. निला बर्नाड सोन्स |
| ६ | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे |
| ७ | श्री. कमलेश यशवंत भोईर |
| ८ | श्री. संजय अनंत थेराडे |
| ९ | श्री. अशोक सूर्यदेव तिवारी |
| १० | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार |
| ११ | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी |
| १२ | श्री. दिनेश तेजराज जैन |
| १३ | श्री. एलायस दुमिंग बांड्या |
| १४ | श्री. अनिल दिवाकर सावंत |
| १५ | श्रीम. गिता हरिष परदेशी |

<u>गैरहजर सदस्य :-</u>

| | |
|---|---|
| १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील |

सर्वप्रथम महानगरपालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन व या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील विषयाचे वाचन केले.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची एक वर्षाकरिता सभापती, स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.**

निर्धारित कार्यक्रमानुसार गुरुवार दिनांक २७/०२/२०२० रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले ४ नामनिर्देशन पत्र

पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महानगरपालिका सचिव यांनी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक २८/०२/२०२० रोजी सकाळी ११.४५ वाजता सादर केली. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. कमलेश यशवंत भोईर | श्रीम. पांडे स्नेहा शैलेश | श्री. अनिल दिवाकर सावंत |
| २ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | श्री. सिंग श्रीप्रकाश जिलेदार (मुन्नासिंग) | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल |
| ३ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | श्री. थेराडे संजय अनंत |
| ४ | श्री. जैन दिनेश तेजराज | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | श्रीम. सोनार सुरेखा प्रकाश |

तद्नंतर मा. पिठासीन अधिकारी यां नी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले. नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम सकाळी ११.४७ वाजता सुरु झाले.

१. सर्वप्रथम श्री. कमलेश यशवंत भोईर यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली . श्री. कमलेश यशवंत भोईर यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्या श्रीम. पांडे स्नेहा शैलेश यांनी स्वाक्षरी केली आहे. व अनुमोदक म्हणून श्री. अनिल दिवाकर सावंत यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वा क्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली . उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्री. कमलेश यशवंत भोईर यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

२. दुसरे नामनिर्देशन पत्र श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. सिंग श्रीप्रकाश जिलेदार (मुन्नासिंग) यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांनी स्वाक्षरी केलेली आहे . छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार , सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही . त्यामुळे श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

३. तिसरे नामनिर्देशन पत्र देखील श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांचे आहे. श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. थेराडे संजय अनंत यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रां वरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री . वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात

आली. छाननी पुर्ण झाल्या नंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली . उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही . त्यामुळे श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

४. चौथे नामनिर्देशन पत्र श्री. जैन दिनेश तेजराज यांचे आहे. श्री. जैन दिनेश तेजराज यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. शाह राकेश रतिशचंद्र यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीम. सोनार सुरेखा प्रकाश यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रां वरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री . वासुदेव शिरवळकर यांच्यामार्फत करण्यात आली . छाननी पुर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली . उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही . त्यामुळे श्री. जैन दिनेश तेजराज यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले. सदरचे नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे मी घोषीत करीत आहे.

श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांची दोन नामनिर्देशन पत्र असल्याने पहिले नामनिर्देशन पत्र ग्राह्य धरण्यात येत आहे. नामनिर्देशन पत्र ४ असली तरी उमेदवार ३ आहेत. छाननी अंती १) श्री. कमलेश यशवंत भोईर २) श्री. तिवारी अशोक सुर्यदेव व ३) श्री. जैन दिनेश तेजराज हे तीन वैध उमेदवार असल्याचे मी घोषीत करीत आहे.

वरीलप्रमाणे तीन उमेदवारांचे चारही अर्ज वैध करण्यात आले. छाननी अंती वैध उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. कमलेश यशवंत भोईर |
| २ | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव |
| ३ | श्री. जैन दिनेश तेजराज |

अशा प्रकारे छाननीचे काम सकाळी ११.४७ मि. सुरु करुन सकाळी ११.४९ मिनीटांनी संपविण्यात आले. त्यानंतर पीठासीन अधिकारी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(३) अन्वये ज्या कोणत्या उमेदवारास आपले नामनिर्देशन पत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी सकाळी ११.५० ते दुपारी १२.०५ या १५ मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देश पत्र मागे घेता येईल असे जाहिर केले.

दिलेल्या मुदतीमध्ये श्री. जैन दिनेश तेजराज यांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे. त्यामुळे दोन उमेदवार रिंगणात राहिलेले आहेत.

उमेदवार दोन शिल्लक असल्याने नियम ६ (२) प्रमाणे उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे आवश्यक असुन, वर्णानुक्रमे नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्री. कमलेश यशवंत भोईर

२) श्री. तिवारी अशोक सुर्यदेव

" सभापती " पदाच्या निवडणुकीसाठी दोन उमेदवार शिल्लक राहिले आहे त. सभापती पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन शिल्लक राहिल्याने नियम ६ (३) प्रमाणे "हात वर" करुन मतदान घेण्यात येत आहे. प्रथम उमेदवार श्री. कमलेश यशवंत भोईर यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे , असे पिठासीन अधिकारी यांनी सांगि तले. तेव्हा श्री. कमलेश यशवंत भोईर यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. एलायस दुमिंग बांड्या |
| २ | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे |
| ३ | श्री. कमलेश यशवंत भोईर |
| ४ | श्री. अनिल दिवाकर सावंत |
| ५ | श्रीम. गिता हरिष परदेशी |

दुसरे उमेदवार श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले . त्यानंतर श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल |
| ३ | श्री. श्रीप्रकाश सिंह (मुन्ना सिंग) |
| ४ | श्री. राकेश रतिशचंद्र शाह |
| ५ | श्रीम. निला बर्नाड सोन्स |
| ६ | श्री. संजय अनंत थेराडे |
| ७ | श्री. अशोक सूर्यदेव तिवारी |
| ८ | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार |
| ९ | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी |
| १० | श्री. दिनेश तेजराज जैन |

हात वर करुन मतदान घेतले असता १) श्री. कमलेश यशवंत भोईर यांना ०५ इतकी मते व २) श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांना १० इतकी मते मिळाली. कुणीही सदस्य तटस्थ राहिलेला नाही.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जा स्त मते श्री. तिवारी अशोक सुर्यदेव यांना मिळाल्याने ते सभापती, स्थायी समिती पदी एक वर्षाकरिता बहुमताने निवडून आल्याचे नियम ६ (७) अन्वये पिठासीन अधिकारी यांनी घोषीत केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव , मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सादर करण्यात आले. अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले . सभेच्या पूर्ण कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले . तद्नंतर उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामाकाज दुपारी १२.११ वाजता संपल्याचे जाहिर केले.

(मिलिंद बोरीकर)
पिठासीन अधिकारी
तथा
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
स्थायी समिती सभापती निवडणूक २०२०
मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक :- २८/०२/२०२०
स्थान :- मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन,
दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री
सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका